स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

शोध - प्रबंध पूर्व संशोधन आराखडा

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या मानव्य विद्याशाखे अंतर्गत लोकप्रशासन विषयातील पीएच्.डी. पदवीकरिता सादर करावयाचा शोध प्रबंधाचा पूर्व संशोधन आराखडा

संशोधन विषय

अल्पसंख्याक समाजाच्या विकासात मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाची भूमिका : विशेष संदर्भ लातूर जिल्हा

संशोधक

प्रा. शेख शौकतअली लियाकत अली

शिवनेरी महाविद्यालय, शिरुर अनंतपाळ, जि. लातूर

मार्गदर्शक

प्रा. डॉ. शिंदे प्रकाश रावसाहेब

लोकप्रशासन विभाग प्रमुख

शिवाजी महाविद्यालय, रेणापूर, जि. लातूर

जानेवारी - २०२४

अल्पसंख्याक समाजाच्या विकासात मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाची भूमिका : विशेष संदर्भ लातूर जिल्हा

1.1 प्रस्तावना :

जगामध्ये प्राचीन काळापासून ते आजच्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगापर्यंत अनेक बदल होत गेले यामध्ये प्राचीन काळात देखील लोकहित व मानवीहिताकडे अधिक लक्ष देण्यात आले होते परंतु पोलीसी राज्याचा स्वीकार केला असल्यामुळे प्राचीन काळात संरक्षण व महसूल व्यवस्थेवर अधिक भर देण्यात आला होता. मात्र दुस–या महायुध्दाच्या परिणाम स्वरुप झालेली मानवी व वित्तहानी पाहता सर्वच राष्ट्र एकत्रित आले व त्यांनी मानवी हक्काचे संरक्षण करणारी व लोककल्याणकारी राज्याची तत्त्वे स्वीकारले. लोककल्याणकारी राज्यामध्ये जनतेचे हित व कल्याण यावर अधिक भर देण्यात येत असतो. लोककल्याणकारी राज्यामध्ये प्रत्येक जनतेचे हित साध्य करण्याचा प्रयत्न केला जातो. लहानातल्या लहान घटकांपर्यंत योजना, सेवा पुरविण्याचे ध्येय ठेवण्यात येते. त्यामुळे समजातील धार्मिक, भाषिक, लिंग आधारित अल्पसंख्याक यांच्या सर्वांगिण विकासासाठी देखील जागतिक स्तरावर मानवी हक्काच्या माध्यमातनू व राष्ट्रस्तरावर संविधान, कायदे व विविध शासनाच्या माध्यमातून प्रयत्न करण्यात येत असतात. लोककल्याणकारी राज्याच्या बाबतीत प्रा. कांट असे म्हणतात की, कल्याणकारी राज्य हे असे राज्य असते जे नागरिकांना व्यापक स्वरुपात सेवा प्रदान करते. यावरुन स्पष्ट होते की, कल्याणकारी राज्यांमध्ये सर्वांचाच विचार करण्यात येते असतो. यापुढे जावून जवहारलाल नेहरु यांनी देखील कल्याणकारी प्रशासनाबाबत मत व्यक्त केले आहे. त्यांच्या मते, सर्वांना समान संधी, श्रीमंत व गरीब यांतील अंतर कमी

करणारी व त्यांच्यातील रहाणीमान यांचा स्तर उंचावणारी राज्य व्यवस्था होय.

भारतात अल्पसंख्याक घटकांबाबत संविधानापासून ते विविध अधिनियमाच्या बाबतून प्रयत्न करण्यात आलेले आहेत. भारतीय अल्पसंख्या हे प्रामुख्याने भाषिक व धार्मिक अधारावर करण्यात आलेले आहेत. भारतीय अल्पसंख्या म्हणजे, मुस्लिम, ख्रिश्चन, शिख, बौध्द, पारसी आणि जैन समुदायास अल्पसंख्याक समजण्यात येते.

भारतातील एकूण लोकख्यांपैकी 18.81 टक्के एवढी लोकसंख्या ही अल्पसंख्याक म्हणून ओळखली जाते ज्याचे विवेचन धर्म निहाय पुढीलप्रमाणे आहे–

मुस्लिम	– 14.23	टक्के
ख्रिश्चन	– 02.30	टक्के
शिख	– 01.72	टक्के
बौध्द	– 0. 70	टक्के
जैन	– 0.37	टक्के

या अल्पसंख्याक समुदायांचा विकास करण्यासाठी आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय स्तरावर विविध प्रयत्न केले जात असतात. यामध्ये संयुक्त राष्ट्र संघटनेत असे स्पष्ट करण्यात आले आहे की, राज्य आपल्या क्षेत्रात अल्पसंख्यांकाच्या सांस्कृतिक, धार्मिक आणि भाषिक वेगळेपणाचे संरक्षण करेल आणि ती जोपसण्यासाठी योग्य वातावरण उपलब्ध करेल. असे मत व्यक्त केले आहे. तसेच भारतात देखील भारतीय कलम 25, 27, 29, 30 व 350 अ, 350 ब मध्ये अल्पसंख्यांकाबाबत मत व्यक्त केले आहे. व 18 डिसेंबर हा राष्ट्रीय अल्पसंख्याक दिन म्हणून साजरा केला जातो. महाराष्ट्रात देखील मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास

महामंडळाची स्थापना करण्यात आली आहे. यावरुन राष्ट्र व राज्याच्या विकासात अल्पसंख्याकांना महत्त्व प्रदान करण्यात आले आहे. त्यांच्या साठी विविध योजना राष्ट्रीय व राज्यस्तरापर्यंत निर्माण करण्यात आलेल्या आहेत.या सर्वांचा आढावा घेण्यासाठी हा प्रस्तुत विषयाची निवड करण्यात आलेली आहे.

1.2 संशोधन विषयाचे महत्त्व –

आजच्या या आधुनिक लोककल्याणकारी राज्यव्यवस्थेत लोककल्याणकारी प्रशासन व्यवस्था निर्माण होताना दिसत आहे. लोकप्रशासनातील सामाजिक कल्याण प्रशासन ज्ञानशाखे अतंर्गत जगातील व देशातील विविध कल्याणकारी योजना, धोरणे, कार्यक्रम व निर्णयांचा अभ्यास केला जातो. सामाजिक प्रशासनाच्या अंतर्गत महिला व बालकल्याण, वृध्द कल्याण, युवा कल्याण यासोबत भाषिक, धार्मिक अल्पसंख्याक कल्याणाबाबत अभ्यास केला जातो. सामाजिक कल्याण प्रशासनामध्ये अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती, इतर मागासवर्गीय, महिलां यासोबत यासर्वांमध्ये विविधस्तरावर जे अल्पसंख्याक आहेत अशा घटकांचा समावेश करण्यात आलेला आहे. या सर्वांसाठी आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय स्तरावर व राज्यस्तरावर अल्पसंख्याक विकासासाठी कार्य केले जात असल्याचे दिसून येते. त्यामुळे लोकप्रशासनातील सामाजिक कल्याण प्रशासन अंतर्गत अल्पसंख्याक समाजाच्या आर्थिक व शैक्षणिक विकासात शासनाची भूमिका अभ्यासत असताना महाराष्ट्रातील अल्पसंख्याक समाजाच्या विकासात मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाची भूमिका : विशेष संदर्भ लातूर जिल्हा हा संशोधनात्मक विषय महत्त्वपूर्ण आहे कारण लातूर जिल्हयातील एकूण लोकसंख्या त्यातुलनेने

असणारी अल्पसंख्याकांची लोकसंख्या व त्यांचा होणारा विकास याबाबत माहिती प्राप्त करण्यासाठी हा शोधनिबंध स्वीकारण्यात आलेला आहे.

1.3 संशोधनाची उदिष्टये :

कोणतेही संशोधन कार्य करण्यासाठी संशोधनासाठी एक निश्चित उदेश असणे आवश्यक आहे. ज्यामुळे संशोधन कार्यास एक मार्गदर्शन प्राप्त होते. संशोधक एक निश्चित मार्गाने जात असतो. म्हणून प्रस्तुत संशोधन कार्यासाठी पुढील संशोधन उदिष्टये ठरविण्यात आले आहेत.

1 महाराष्ट्रातील अल्पसंख्याक समाजाच्या सामाजिक स्थितीचा अभ्यास करणे.

2 लातूर जिल्हयातील अल्पसंख्याक समाजाची आर्थिक व शैक्षणिक स्थितीचा अभ्यास करणे.

3 अल्पसंख्याक समाजाच्या सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक विकासाबाबतच्या राष्ट्रीय व राज्यस्तरीय योजनांचा अभ्यास करणे.

4 अल्पसंख्याक समाजाच्या विकासातील राष्ट्रीय अल्पसंख्याक आयोग व राज्य अल्पसंख्याक आयोगाची भूमिकांचा अभ्यास करणे.

5 अल्पसंख्याक समाजाच्या विकासात मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाची भूमिका अभ्यासणे.

1.4 संशोधनाची गृहितकृत्ये :

प्रस्तुत संशोधन कार्यासाठी मार्गदर्शक ठरणारी व संशोधन कार्यास मर्यादीत स्वरुपात ठेवणारी दिशादर्शक म्हणून गृहितकृत्ये ओळखले जातात.

प्रस्तुत संशोधनासाठी पुढील गृहितकृत्याचा स्वीकार करण्यात आलेला आहे.

1 राष्ट्रीय स्तरावर अल्पसंख्याक समाजासाठी संवैधानिक व कायदेशीर तरतुदी करण्यात आल्या आहेत.

2 देशातील अल्पसंख्याकांचा विकासात राष्ट्रीय अल्पसंख्यांक आयोग कायदा –1992 महत्त्वाची भूमिका पार पाडत आहे.

3 मुस्लिम समाजाची साक्षरता राष्ट्रीय साक्षरता सरासरीपेक्षा कमी आहे.

4 महाराष्ट्रामध्ये मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळाने शैक्षणिक विकासात महत्त्वाची भूमिका बजावलेली आहे.

5 लातूर जिल्हयातील अल्पसंख्याक समाजाचा शैक्षणिक व आर्थिक विकास फारसा झालेला नाही.

1.5 संशोधन विषयाची व्याप्ती :

संशोधन विषयाची व्याप्ती म्हणजे संबंधीत विषय हा कीती व्यापक होवू शकतो याचा आढावा घेणे होय. प्रस्तुत संशोधन हे जागतिक स्तरांपासून ते राष्ट्रास्तराचा आधार असणा–या जिल्हास्तरापर्यंत व्यापक असल्याचे दिसून येते. जागतिक स्तरावर युनोच्या माध्यमातून अल्पसंख्याक घटकांच्या विकासासाठी तरतूद करण्यात आलेली आहे. तसेच राष्ट्रीय स्तरावर भाषिक, धार्मिक अल्पसंख्याक समुदायाच्या विकासासाठी घटनेपासून ते विविध कायदे व आयोगाद्वारे प्रयत्न करण्यात आलेले आहेत. त्याच बरोबर देशातील विविध अल्पसंख्याक समुदायाच्या विकासासाठी आयोग, महामंडळांची स्थापना करुन त्यांचा विकास करण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे. यावरुन स्पष्ट होते की प्रस्तुत विषयाची व्याप्ती खूप मोठी आहे.

1.6 संशोधन विषयाची मर्यादा –

प्रस्तुत संशोधन विषयाची व्याकता खूप मोठी असली तरी संशोधन कार्याच्या मर्यादांमुळे या संशोधन कार्यावर काही मर्यादा निश्चित करण्यात आल्या आहेत. या मर्यादेमध्ये कालमर्यादा, अभ्यासक्षेत्र मर्यादा निश्चित करण्यात आलेली आहे. यामध्ये केवळ 2011 ते 2020 पर्यंतच्या योजनांचा

अभ्यास करण्यात येणार आहे. तसेच क्षेत्र मर्यादेमध्ये केवळ लातूर जिल्हयातील अल्पसंख्याक समाजाचा केवळ सामाजिक व शैक्षणिक विकासातील मौलाना आझाद अल्पसंख्याक आझाद महामंडळाची भूमिकेचा अभ्यास करण्यात येणार आहे.

1.7 संशोधन पध्दती –

संशोधन कार्याद्वारे असे प्रश्न किंवा समस्यांची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न केला जातो ज्याची उत्तरे किंवा समाधान अद्याप प्राप्त झालेली नसतात. संशोधन एक प्रक्रिया असून जी तथ्य विश्लेषणाच्या आधारे कोणत्याही समस्यांचे यथार्थ समाधान प्राप्त करून देते. ज्यामुळे मणुष्याच्या ज्ञानात वृध्दी होते, जे मानवी जीवनास सुगम व उत्तम बनविते. मात्र संशोधन कार्याला सुरूवात करण्यापूर्वी संशोधन विषयाची निवड झाल्यानंतर संशोधनाची उद्दिष्टये पूर्ण करण्यासाठी व संशोधनाला योग्य दिशा मिळण्यासाठी योग्य संशोधन पध्दती निश्चित केली आहे. संबंधित विषयाचे शास्त्रशुध्द संशोधन करण्यासाठी विविध पध्दतीद्‌वारे माहिती मिळवावी लागते त्यामुळे संबंधित विषयाची माहिती संग्रहीत करणे सोपी जाते. मॅक्गयूगण च्या मते वैज्ञानिक संशोधन पध्दती म्हणजे "वैज्ञानिक संशोधन पध्दती ही एक अशी क्रमबध्द प्रक्रिया आहे की, जिच्याद्वारे विज्ञानाने आपल्या प्रश्नाची उत्तरे मिळतात." या संशोधन विषयाचे उदिदष्टे पूर्ण करण्यासाठी संशोधकाने शास्त्रशुध्द व वैज्ञानिक संशोधन पध्दतीचा वापर केला आहे. संशोधन विषयातील तथ्य व वस्तुनिष्ठ माहिती शोधण्यासाठी वैज्ञानिक माहितीचा आधार घेतला आहे.

१.८ तथ्य संकलन पध्दती :-

संशोधन साहित्याचे संकलन हे वस्तुनिष्ठपणे केले आहे पण त्यामध्ये व्यक्तीनिष्ठता तसेच पूर्वग्रहदुषीतपणा येणार नाही याची काळजी

घेतली आहे. संशोधन विषयाचे अध्ययन करण्यासाठी संशोधकाला विविध स्वरूपाची माहिती मिळवावी लागते. त्या दृष्टीने संशोधकाला लातूर जिल्हयातील अल्पसंख्याक समुदायाच्या समस्या शोधून निष्कर्ष काढण्यासाठी विविध प्रकारची माहिती संकलित करावी लागते. ती संकलित करण्यासाठी वर्णानात्मक व विश्लेषात्मक संशोधन पध्दतीचा वापर केला आहे. यात संशोधन उद्देशाला धरुन तथ्य, माहिती व आकडेवारीच्या आधारावर अध्ययन विषयाचे विस्ताराने स्पष्टीकरण केले आहे. ते सर्वेक्षण, मुलाखती, निरीक्षण याच्या साह्याने अध्ययन विषयाचे विस्ताराने स्पष्टीकरण केले आहे. ती संकलित करण्यासाठी पुढील साधनसामग्रीचा उपयोग केला जातो.

अ) प्राथमिक माहिती :-

संशोधकाने संशोधन विषयासंबंधी प्रकाशीत न झालेली व स्वत: अध्ययनातून मिळवलेली माहिती म्हणजे प्राथमिक सामग्री होय. या माहिती संग्रहणामध्ये संशोधक हा स्वत: क्रियाशील असतो. या पध्दतीमध्ये पुढील घटकांचा समावेश होतो.

१) मुलाखत :

माहिती संकलनासाठी मुलाखत हा विश्वसनीय मार्ग समजला जातो. कारण मुलाखती द्वारे समोरच्या व्यक्तीचे विचार अधिक स्पष्टपणे समजतात. संशोधकाला संबंधीत विषयाची माहिती जशा पध्दतीने पाहिजे त्या पध्दतीने उपलब्ध होते.

२) अवलोकन पध्दत :

संशोधन विषयासंबंधी माहिती ही वेगवेगळया फाईल बनवून त्यामध्ये संग्रहित केलेली असते. ती माहिती प्रकाशित होतेच असे नाही. त्यावेळी त्या सर्व फाईल मधील माहितीचे संशोधकाने अवलोकन करुन

मिळवली आहे. त्या फाईलीचा अभ्यास केलेला आहे. कोणती माहिती संशोधनासाठी उपयोगाची आहे तेवढी माहिती घेतली आहे.

ब) दुय्यम माहिती :

दुय्यम माहिती ही अगोदरच प्रकाशीत झालेली असते. ती फक्त गोळा करण्याचे कार्य संशोधकाला करावे लागते. ही माहिती वेग-वेगळया मार्गाने आपणाला उपलब्ध करता येत असते. ते पुढील प्रमाणे पाहता येईल.

१) वार्षिक अहवाल व शासकीय प्रकाशने :

२) पुस्तके व प्रकाशित शोध निबंध :

३) वर्तमानपत्र व मासिके:

1.9 नमुना निवड –

प्रस्तुत संशोधन कार्यासाठी प्राथमिक स्त्रोत म्हणून लातूर जिल्हयातील अल्पसंख्याक समुदायाच्या लाभार्थी, मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळातील अधिकारी, व जिल्हयातील अल्पसंख्याक समाजातील राजकीय नेत्याच्या भूमिकांचा अभ्यास करण्यासाठी 10 पदाधिकारी, 10 प्रशासकीय अधिकारी व लातूर जिल्हयातील प्रत्येक तालुक्यातून 50 लाभार्थी असे 500 नुमना निवड करण्यात येणार आहे.

1.10 संशोधन आराखडा –

प्रस्तुत संशोधन कार्य करताना संशोधन हे योग्य मार्गावर जाण्यासाठी संशोधन कार्याचा आराखडा पुढीलप्रमाणे करण्यात आलेला आहे.

प्रकरण – 1

प्रस्तावना व संशोधन पध्दती

प्रस्तुत प्रकरणांमध्ये कल्याणकारी योजना, देशातील विविध समुदाय व त्यांच्यासाठीची कायदे व प्रयत्न, संशोधन विषयाचे महत्त्व, संशोधन पध्दती, संशोधन साहित्याचा आढावा याचा अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण – 2

अल्पसंख्याक समाजाची पार्श्वभूमी व सद्यस्थिती

प्रकरण दोन मध्ये देशातील अल्पसंख्याक समाजाची पार्श्वभूमी, त्यांची सामाजिक, आर्थिक स्थिती, राज्यस्तरावरील तसेच लातूर जिल्हयातील अल्पसंख्याक समुदायाच्या स्थितीचा अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण – 3

अल्पसंख्याक समुदाय – विकासात्मक योजना व कायदे

तिस—या प्रकरणामध्ये अल्पसंख्याक समुदायाबाबतच्या राष्ट्रीय व राज्य स्तरावरील योजना, विविध कायदे, तसेच आयोगाचा अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण – 4

मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ संरचना व भूमिका

प्रस्तुत प्रकरणामध्ये मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ संरचना व भूमिका त्यांनी केलेल्या विविध आर्थिक व शैक्षणिक योजनांचा आढावा घेण्यात येणार आहे.

प्रकरण – 5

लातूर जिल्हयातील अल्पसंख्याक समाजाच्या विकासात मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाची भूमिका

प्रस्तुत प्रकरणामध्ये लातूर जिल्हयातील अल्पसंख्याक समाजाच्या आर्थिक विकासात मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाची भूमिका तपसाण्यासाठी लातूर जिल्हयातील अल्पसंख्याक समुदायाच्या प्रश्नावली व मुलाखतीद्वारे मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाच्या आर्थिक भूमिकांचे अध्ययन करण्यात येणार आहे.

प्रकरण – 6

निष्कर्ष व शिफारशी

प्राप्त तथ्यांच्या आधारे अध्ययनांती निष्कर्ष काढून योग्य त्या शिफारशी करण्यात येणार आहेत.

1.10 संदर्भ ग्रंथ –

१. बोधनकर सुधीर व आलोनी विवेक, सामाजिक संशोधन पध्दती, साईनाथ प्रकाशन, नागपूर, १९९९

२. आहुजा राम, सामाजिक अनुसंधान, रावत पब्लिकेशन्स, जयपूर एवं नई दिल्ली, २००८

३. कऱ्हाडे बी.एस., सामाजिक संशोधन पध्दती, पिंपळापुरे अँड कंपनी पब्लिशर्स, नागपूर, २००७

४. डॉ. सुरेद्र कटारीया, समाजिक कल्याण प्रशासन, नॅशनल पब्लिसिंग हाऊस, जयपुर एवं दिल्ली, २०००

५. डॉ. दयाकृष्ण मिश्र, सामाजिक कल्याण, पब्लिसिंग हाऊस, नवी दिल्ली, १९९६

६. शरदचंद्र गोखले, सामाजिक विकासाचे प्रश्न आणि धोरण, विहनस प्रकाशन, पुणे, १९८९

७. प्रा. चंद्रशेखर लाखे, सामुदायिक विकास व शिक्षण विस्तार, श्री. मंगेश प्रकाशन, नागपुर, १९९५

८. समाजकल्याण मासिक,१९९६

९. साधना मासिक, २५ मार्च २०००

१०. महाराष्ट्र जनगणना अहवाल, २०११-१२

११. प्रा. बा. बा. तिजारे, सामुदायिक विकास व विस्तार, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळासाठी, विद्या प्रकाशन, औरगांबाद, १९८३

१२. भारत २०१५, वार्षिक संदर्भ ग्रंथ, न्यू मीडिया विंग, प्रकाशन विभाग, सूचना और प्रसारण मंत्रालय, भारत सरकार

१३. वार्षिकी २०१५, महाराष्ट्र, (संपा) तुकाराम जाधव, युनिक प्रकाशन, पुणे

१४. जरारे विजय लक्ष्मण, संशोधन प्रणाली, अद्वैत प्रकाशन, अमरावती, २००४

१५. डॉ. सुनिल जाधव, सामाजिक संशोधन पध्दती, अरुणा प्रकाशन, लातूर, २०१२

१६. मेश्राम, सामाजिक संशोधन प्रक्रिया, नई दिल्ली, २०००

१७. पाटील वा.भ. संशोधन पध्दती, रंगराव पाटील प्रकाशन,पुणे, १९९८

१८. आगलावे प्रदीप, सामाजिक संशोधन पध्दती, साईनाथ प्रकाशन, नागपूर, २०००

१९. डॉ. लक्ष्मण कोत्तापल्ले, भारतातील सामाजिक कल्याण प्रशासन, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, २००९

संशोधक

प्रा. शेख शौकतअली लियाकत अली
लोकप्रशासन विभाग
शिवनेरी महाविद्यालय, शिरुर अनंतपाळ
जि. लातूर

मार्गदर्शक

प्रा. डॉ. शिंदे प्रकाश रावसाहेब
लोकप्रशासन विभाग प्रमुख
शिवाजी महाविद्यालय, रेणापूर
जि. लातूर